# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे


क्रमांक/सामान्य/कक्ष-४/टे १/सेतू/कावि-F१५३४२२५२९०२८० दिनांक ३०/०१/२०१९

विषय : ठाणे जिल्हयातील "नविन आपले सरकार सेवा केंद्र" अधिसुचित करुन केंद्राची यादी जिल्हयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत व नविन आपले सरकार केंद्रासाठी अर्ज मागविणेबाबत

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.मातंसे-१७१६/प्र.क्र.५१७/३९ दिनांक १९ जानेवारी २०१८
२. सेतू समितीची बैठक दिनांक १४/०१/२०१९

**अधिसूचना**

उपोद्घातातील १ नुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मातंसे-१७१६/प्र.क्र.५१७/३९ दिनांक १९ जानेवारी २०१८ व सेतू समितीच्या दिनांक १४/०१/२०१९ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेल्या १४६ केंद्रा चे सोबतचे परीशिष्ट अ मधील यादीतील केंद्राना **"आपले सरकार केंद्र"** चालविणेसाठी मान्याता देण्यात येत आहे.

**जिल्हयातील सर्व आपले सरकार सेवा केंद्राने खालील अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करावी.**

१. आपले सरकार सेवाकेंद्रा मार्फत महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक १९/०१/२०१८ परिशिष्ट-क मध्ये नमुद केलेल्या सर्व सेवा नागरिकांना देणे आवश्यक आहे. तसेच सदरहु शासन निर्णयात नमूद केलेली आपले सरकार केंद्र चालवण्याची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडणेच्या आहेत.
२. शासनान ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार आपले सरकार सेवा केंद्र चालू ठेवून नागरिकांना सेवा पुरविणे
३. शासनाने ठरवून दिलेले ब्रॅडिंग चा वापर करणे तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने स्थापन केलेल्या हेल्पलाईन क्रमांकाचा तपशील आपले सरकार सेवा केंद्राच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करणे.
४. शासनाने ठरवून दिलेले दर केंद्रावर प्रसिध्द करणे तसेच ठरवून दिलेल्या दारापेक्षा अधिक शुल्काची आकारणी न करणे.
५. शासनाने पुरविलेल्या वस्तू,अज्ञावली इ. चे योग्य वापर, संरक्षण व जतन करणे.
६. सर्व ग्राहकांना सौजन्याची वागणूक देणे आणि आवश्यक मदत व सहकार्य करणे.
७. विविध शासकीय योजनांच्या अंमलबाजावणीत ठरवून दिलेले वेळापत्रक व निर्देश काटेकोरपणे पाळणे.
८. पर्यवेक्षीय संस्था, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार माहिती पुरविणे व दिलेल्या निर्देशांचे पालन करणे.
९. आपले सरकार सेवा केंद्र मंजूर ठिकाणीच चालविण्यात यावे अन्यथा इतर ठिकाणी आढळून आल्यास त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.
१०. नागरिकांना स्विकारण्यात येणा-या पेमेंटसाठी ई-सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात डिजीटल पेमेंटला प्राधान्य देणे.
११. आपले सरकार केंद्रा बाबत कुठल्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास, त्यामध्ये तथ्य आढळून आल्यास आपले केंद्राची मान्यता पुर्व सूचना न देता रद्द करणेत येईल.

वरील अटी व शीर्तींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास आपले केंद्राची मान्यता पुर्व सूचना न देता रद्द करणेत येईल.


ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे - ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ - २५३४ ३६३६ /२५३४ १७३७ /३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in

तसेच उर्वरित रिक्त जागांसाठी व ज्या अर्जदारांचे अर्ज अपात्र ठरले आहेत त्यांना नव्याने फॉर्म भरुन देण्याची संधी देण्यात येत आहे. तरी "**आपले सरकार सेवा केंद्र**" स्थापन करण्यासाठी संबंधित गावातील/ शहरातील इच्छूक व्यक्तीने यासोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंत करु शकता.

सही/-

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा सेतू समिती, ठाणे**

प्रत : १. मा.संचालक,माहिती व तंत्रज्ञान विभाग (सा.प्र.),मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव

२. मा.प्रधान सचिव,महसूल व वन विभा, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव

३. मा.विभागीय आयुक्त,कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांना महितीसाठी व कार्यालयाचे सूचना फलकावर आणि ग्रामपंचायत स्तरावर प्रसिध्द करणेत यावी.

५. आयुक्त ठाणे/कल्याण-डोबिंवली /उल्हासनगर/नवी मुंबई/भिवंडी-निजामपूर/मिरा-भाईंदर यांना महितीसाठी व कार्यालयाचे सूचना फलकावर आणि प्रभाग कार्यालयावर प्रसिध्द करणेत यावी.

६. जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, ठाणे (NIC) कार्यालय यांना कळविणेत येते की, सोबत देण्यात आलेली माहिती जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी.

७. जिल्हा महिती अधिकारी , ठाणे यांना कळविण्यात येते की, स्थानिक वर्तमानपत्रातून सदरची बातमी विनामुल्य प्रसिध्द करावी.

८. उप विभागीय अधिकारी ठाणे/भिवंडी/कल्याण/उल्हासनगर यांनी कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करावी.

९. तहसिलदार ठाणे/भिवंडी/कल्याण/मुरबाड/उल्हासनगर/अंबरनाथ/शहापूर यांनी कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करावी.

१०. मुख्याधिकारी, अंबरनाथ/कुळगांव-बदलापूर/मुरबाड/शहापूर यांनी कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करावी.

११. जिल्हा व्यवस्थापक, सी.एस.सी. ठाणे

स्थळ प्रतीवरी मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा सेतू समिती, ठाणे यांची स्वाक्षरी असे

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा सेतू समिती, ठाणे करिता**